N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0133 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/04/2025 18:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/04/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/04/2025

**Time From (वेळेपासून):** 07:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 09:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/04/2025 **Time (वेळ):** 18:12 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 050

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/04/2025 18:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मनपाशेलाजी वन्नाजी विदयालय,शाळा नं 24, रविवार पेठ, कोल्ह,कोल्हापूर,येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन मोतीलाल कांबळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शांतीनगर, गाडगीळ कलनी, पाचगांव, ताकरवीर, जि कोल्हा,राजारामपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शांतीनगर, गाडगीळ कलनी, पाचगांव, ताकरवीर, जि कोल्हा,राजारामपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9922669586

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय जयसिंग नार्वेकर | | | 1. सं◌ागाव रोड, दत्त कलनी, कागल, ,कोल्हापूर,कागल, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रु दराच्या सहा भारतीय | 3,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No. (अ.क्र.)** **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)**

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 17/04/2025

मी सचिन मोतीलाल कांबळे, वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा.षांतीनगर गाडगिळ कॉलनी, पाचगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर, मो.नं.9922669586 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 14/04/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मला जातीचा दाखला काढावयाचा असल्याने मी दिनांक 07/04/2025 रोजी 10.00 वा. सुमारास महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24, रविवार पेठ, कोल्हापूर या षाळेत माझे चुलते दिलराज यल्लेषराव कांबळे यांचा षाळा सोडल्याचा दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला होता. अर्जासोबत मी माझे वडील मोतीलाल यल्लेषराव कांबळे यांचा षाळा सोडल्याचा दाखल्याची छायांकित प्रत जोडली होती. त्यावेळी षाळेचे मुख्याध्यापक यांनी मला वडिलांचा दाखला चुकीचा असल्याचे सांगितले. तसेच रेकॉर्ड चेक करत असताना माझे चुलते दिलराज यल्लेषराव कांबळे यांचेसह माझे इतर चुलते 1) प्रतापचंद्र यल्लेषराव कांबळे, 2) कौतुक यल्लेषराव कांबळे, 3) जयसिंह यल्लेषराव कांबळे व 4) गांधीबाबा यल्लेषराव कांबळे यांच्याही नोंदी मिळाल्याने मी मुख्याध्यापक यांना मला माझे वडिलांचा नवीन षाळा सोडल्याचा दाखला व इतर 05 चुलते असे एकुण 06 षाळा सोडल्याचे दाखले पाहिजे असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक यांनी मला तसा अर्ज करण्यास सांगितले होते. त्यानंतर मी दिनांक 12/04/2025 रोजी सकाळी 10.30 वा. चे सुमारास म.न.पा षेलाजी वन्नाजी विदयालय, या षाळेत माझे वडील व इतर 05 चुलते यांचे षाळा सोडल्याचा दाखला मिळण्याकरीता अर्ज घेवुन गेलो असता षाळेचे मुख्याध्यापक यांनी मला षाळा सोडल्याचे दाखले देण्याकरीता प्रत्येक दाखल्याचे 500/-रू प्रमाणे असे एकुण 3,000/-रूपयाची मागणी करून दिनांक 15/04/2025 रोजी 08.00 वा. 3000/-रू व अर्ज घेवुन येण्यास सांगितले आहे. शाळा सोडलेचा दाखला मिळणेबाबत म.न.पा. शाळा यांचेकडुन कोणतीही फी आकारली जात नाही. मुख्याध्यापक माझेकडे मागणी करत असलेले 3000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असल्याने त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 08.00 वा चे सुमारास मुख्याध्यापक यांना महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24, रविवार पेठ, कोल्हापूर येथे भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. साळुंके साहेब आलेनंतर मी साहेबांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेब यांनी मला दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 07.00 वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे येण्यास सांगितले.

दिनांक 15/04/2025 रोजी मी सकाळी 07.15 वा चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर कार्यालयात हजर झालो त्यावेळी साळुंके साहेबांनी तेथे उपस्थित असलेला त्यांचा स्टाफ व शासकीय पंच यांची ओळख करून दिली त्यानंतर मी पंचाना माझी वरील प्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पंचानी माझी लेखी तक्रार व मी सांगितलेली तक्रार एकच असलेची खात्री केलेनंतर लेखी तक्रारीवर त्यांनी व साळुंके साहेबांनी सहया केल्या. साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन कोल्हापूर महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24,येथील मुख्याध्यापक यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये पुर्वीचे

कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सकाळी 07.47 वाजता चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 खोत यांना माझेकडील मोटर सायकल हिरो स्प्लेन्डर प्लस नंबर डभ09.म्थ.8638 वरून शेलाजी वन्नाजी विदयालय रविवार पेठ कोल्हापूर येथे पाठवुन दिले आम्ही तेथे पोहचल्यानंतर मुख्याध्यापक रूममध्ये गेलो तेथे मुख्याध्यापक नव्हते त्यावेळी मी तेथे उपस्थित असलेल्या एका शिक्षकास मुख्याध्यापक आल्यात काय? असे विचारले त्यावेळी त्या शिक्षकांनी या की काय म्हणताय असे विचारले त्यावेळी मी त्यांना दाखल्यासाठी परवा येवुन गेलतो असे सांगितले त्यावेळी त्यांनी अर्ज दिलाय काय? असे विचारले. त्यावेळी मी त्यांना अर्ज आणल्याचे सांगितले असता त्या शिक्षकांनी मला अर्ज देवुन जाणेस सांगितले व मुख्याध्यापक यांना अचानक मिटींग लागल्याने ते मिटींगला गेल्याचे सांगितले.त्यावेळी मी अर्ज त्या शिक्षक यांच्याकडे दिला त्यावेळी आमचेत दाखल्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्या शिक्षकांनी उदया येण्यास सांगुन आज सर दिवसभर येणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना मुख्याध्यापक यांचे नाव विचारले असता त्यांनी मुख्याध्यापक यांचे नाव संजय नार्वेकर असलेबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यालयात आलो त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 08.02 वाजता बंद केला. त्यावेळी मी साहेबांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगीती करून साळुंके साहेबांनी आम्हा सर्वांना पुढील कारवाई दि.16/04/2025 रोजी सकाळी 07.00 वा करणेचे असल्याचे सांगुन हजर राहणेस सांगितले.

दिनांक 16/04/2025 रोजी सकाळी 07.10 वा चे सुमारास मी ला.प्र.वि.चे कार्यालयात आलो त्यावेळी साळुंके साहेब, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ असे हजर होते. त्यावेळी साळुंके साहेबांनी कोल्हापूर महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24,येथील मुख्याध्यापक नार्वेकर सर यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर सकाळी 07.30 वाजता चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 खोत यांना पाठविले. आम्ही शाळेत पोहचलो त्यावेळी मला तेथे मुख्याध्यापक नार्वेकर भेटले त्यांनी मला तासभर बसणेस सांगितले. त्यावेळी मी थांबतो असे म्हणालो. त्यानंतर नार्वेकर सर कोठेतरी निघुन गेले आम्ही थांबुन राहीलो. त्यानंतर मला तेथे मागच्या पडताळणी कारवाईवेळी भेटलेले शिक्षक भेटले त्यांनी मला तास दिड तास बसुन कटांळाल त्यापेक्षा काम काय असेल तर करून घ्या असे म्हणाले. आम्ही नार्वेकर सर यांची वाट पाहत तेथे थांबुन राहीलो. काहीवेळाने नार्वेकर सर परत आले त्यांनी आम्हाला बघुन "आजुन उभा राहिलासा, तुम्ही दहा वाजता या" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना तब्येत ठिक नसल्याचे सांगितले. त्यावेळी नार्वेकर यांनी "माझी बघा" असे म्हणाले. त्यानंतर आमचेत दाखल्याचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी "वडील मोतीलाल कांबळे व पाच चुलते असे एकुण सहा दाखले आहेत" असे म्हणालो. त्यावेळी नार्वेकर यांनी "पाच सक तिस असे गुणाकर करून तीन हजार घेवुन या येताणा उदया सकाळी" असे म्हणाले. त्यावेळी मी "तीन हजार रूपये" असे विचारले त्यावेळी नार्वेकर यांनी "हु" असा होकार देवुन "उदया सकाळी येताना घेवुन या, आज हे काम पुर्ण करतो,सकाळी या,उदया मला काही काम नाही" असे म्हणाले. मी नार्वेकर सरांना आज दाखले दया असे म्हणालो. नार्वेकर सरांनी उदया येण्याबाबत सांगितले. त्यावेळी मी "तीन हजार रूपये होणार ते" असे विचारले. त्यावेळी नार्वेकर सरांनी "होय" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यालयात आलो त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 09.38 वाजता बंद केला. त्यानंतर तेथे घडलेली सर्व हकीकत साहेबांना सांगितली. मुख्याध्यापक नार्वेकर यांनी सहा दाखल्याचे 500/-रू. प्रमाणे एक असे 6 दाखल्याचे एकुण 3000/-रू लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम दिनांक 17/04/2025 रोजी सकाळी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. मुख्याध्यापक नार्वेकर यांनी माझेकडे मागणी केलेले 3000/-रू हे लाच असल्याचे स्पष्ट झाल्याने साळुंके साहेब यांनी मुख्याध्यापक नार्वेकर यांचे विरूध्द सापळा कारवाई दिनांक 17/04/2025 रोजी सकाळी 07.00 वा करणेचे असल्याचे सांगुन कार्यालयात हजर राहणेस सांगितले.

दिनांक 17/04/2025 रोजी सकाळी 07.10 वाजता मी ला.प्र.वि.चे कार्यालयात आलो त्यावेळी साळुंके साहेब, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ असे हजर होते.त्यावेळी साळूंके साहेबांनी मुख्याध्यापक नार्वेकर यांचेवर आयोजीत केले सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यावेळी त्यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली, त्यावेळी मी माझेकडील 500/- रूपये दराच्या 06 नोटा असे 3,000/- रूपये हजर केले. त्यावेळी साळुंके साहेब यांनी मला व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात फिकट निळसर रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अॅथ्रासिन लावलेले 3,000/- रूपये माझे पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर पुन्हा साळुंके साहेब यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सकाळी 07.48 वाजता सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी व पंच खोत असे माझेकडील मोटर सायकलने कोल्हापूर महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24,येथे जाण्यास निघालो. आमचे पाठोपाठ

साळंुके साहेब, सापळा पथक, पंच नं.2 पाटील आले व कोल्हापूर महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24 रविवार पेठ कोल्हापूर या परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच खोत असे शाळेत जावुन मुख्याध्यापक नार्वेकर यांना भेटलो. त्यावेळी आमचेत दाखल्यांचे अनुषंगाने बोलने चालु होते. त्यावेळी मी त्यांना "हा सर ..ते पैसे सर" असे म्हणालो त्यावेळी नार्वेकर सर "थांबा जरा दाखले पहिले तर देतो " असे म्हणाले. त्यानंतर नार्वेकर सर रजिस्टर पाहुन दाखले तयार करीत होते. त्यावेळी मी तेथे त्याना रजिस्टर दयायला मदत करीत होतो. काहीवेळाने दाखले तयार झालेनंतर नार्वेकर सरांनी मला दाखले बरोबर आहेत का तपासुन बघा असे म्हणाले त्यावेळी मी दाखले पाहुन बरोबर असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी मी त्यांना "सहा दाखले हाईत. सहा दाखलेचे सांगितलेलं तुम्ही तीन हजार रूपये" असे म्हणालो. त्यावेळी नार्वेकर सर तरी त्यात अॅफिडीव्हीट करायला लावल नाही" असे म्हणाले त्यावेळी मी नार्वेकर सर यांना त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम 3000/- रूपये माझे पॅन्टचे पाठीमागील डाव्या खिशातुन डाव्या हाताने काढुन त्यांना दिली त्यावेळी त्यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारून पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या खिशात ठेवली. त्यावेळी मी त्यांना "मोजून बघा सर" असे म्हणालो. त्यावेळी नार्वेकर सर "तुम्हाला अॅफिडीव्हीट करायला लावल नाही तुम्ही बघितलना लीस दिलेल ंहाय" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमचेत दाखल्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी त्यांना " सर त्याची पावती " असे म्हणालो त्यावेळी नार्वेकर सर " पावती राहू दे जावा आता " असे म्हणाले. त्यावेळी मी "पावती राहु दे"असे म्हणालो. त्यावेळी नार्वेकर सर यांनी " पावती त्याचा काय उपयोग हाय तुम्हाला" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना " चुलत्यांना दाखवायला पाहीजे त्यांनी पण पैसे दिलेत" असे म्हणालो असता नार्वेकर सर यांनी "पाठवुन दया की मी माझेकडे सांगा मी त्यांना" असे म्हणाले. त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता साळुंके साहेब त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले व माझेकडील व्हाईस रेकॉर्डर 09.00 वाजता बंद करून तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह मुख्याध्यापक नार्वेकर यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे कार्यालयात पुर्ण करण्यात आली आहे.

तरी मला जातीचा दाखला काढणेकरीता माझे वडील व चुलते यांचे शाळा सोडल्याचे दाखले आवश्यक असल्याने ते दाखले मिळणेसाठी कोल्हापूर महानगरपालिका षेलाजी वन्नाजी विदयालय, षाळा क्र.24 रविवार पेठ कोल्हापूर येथे मी रितसर अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे वडील व पाच चुलते यांचे असे एकुण 06 शाळा सोडल्याचे दाखले देणेकरीता शाळेचे मुख्याध्यापक संजय नार्वेकर यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 3,000/-रू लाचेची मागणी करून मागणी केलेली लाच रक्कम 3,000/- रूपये माझेकडुन बेकायदेशीरपणे स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी संजय जयसिंग नार्वेकर, वय - 52 वर्षे, पद - प्रभारी मुख्याध्यापक, शेलाजी वन्नाजी विद्यालय, शाळा क्रमांक 24 रविवार पेठ, कोल्हापूर रा. सांगाव रोड, दत्त कॉलनी, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

shriram kalyanrao kanherkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.** **(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** **(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court** **(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

HC1200

**Signature of Officer-in-charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** shriram kalyanrao k

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**